सिंधुदुर्ग जिल्हा परिषद
मध्यवर्ती टपाल नोंदणी कक्ष (CRU)
आ.क्र.
आ.दि. 31 DEC 2024
विभाग
आ.लि./क.प्र.सप्रअ/उ-मुकाअ/अ-मुकाअ/मुकाअ

36

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१

क्रमांक: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.०३/शिकाना/आस्था-५ अ दिनांक :२१ डिसेंबर, २०२४

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय : मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.०९.१२.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत दिनांक ०९.१२.२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांनी सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

खालील नमुद मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा :-

१) आपल्या जिल्हा परिषदेचे कामकाज लोकाभिमुख, गतिशील आणि पारदर्शक राहील यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. लोकाभिमुख व पारदर्शक प्रशासनाचा भाग म्हणून तक्रार निवारण यंत्रणा (Grievance Redressal System) सक्षम करण्यात यावे व प्राप्त तक्रारींचा विहित मुदतीत निपटारा करण्यात यावा.

२) केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या Flagship योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. केंद्र पुरस्कृत योजनांचा १०० टक्के निधी खर्च होईल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

३) जिल्हा, तालुका व ग्राम स्तरावर लोकांना देण्यात येणाऱ्या सेवा, तसेच त्या सेवांशी संबंधित माहितीचा अधिकार व आपले सरकार पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या तक्रारी यांचा वेळोवेळी आढावा

घेऊन प्राप्त तक्रारीचे जलद गतीने निवारण करण्यात यावे. यासाठी तालुका व ग्राम पातळीपर्यंत यंत्रणा सुसज्ज करण्यात यावी.

४) प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन निश्चित करून तालुका, जिल्हा, स्तरावर तक्रार निवारण प्रभावी करण्यावर भर देण्यात यावा.

५) शासनाच्या योजना तसेच जनतेच्या हिताचे घेण्यात आलेले निर्णय गाव पातळीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात यावेत. जेनेकरून योजनांची अंमलबजावणी करताणा अडचणी येणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

६) सर्व संकेतस्थळे (websites) तसेच पोर्टल्स नियमितपणे अद्ययावत केली जावीत. सदर संकेतस्थळे ही User friendly राहतील याची खात्री करतानाच त्यांच्या सुरक्षेस (Cyber security) प्राधान्य दिले जावेत. माहितीच्या अधिकाराच्या दृष्टीने अधिकतम माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी. सदर संकेत स्थळांकरिता माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्या समन्वयाने एक कार्यपध्दती तयार करण्यात यावी. याकरिता एका समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

७) Ease of Living ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित सेवा सुलभतेने प्रदान करण्यासाठी प्रक्रिया (Processes) सुधारित करण्यात यावी.

८) प्रशासकीय सेवा देताना सक्षम मनुष्यबळ यंत्रणा तयार करण्यासाठी प्रशासकीय सेवेत नव्याने आलेल्या नवीन कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर (Domain Knowledge and Administrative procedures) भर देण्यात यावा . तसेच या नवीन कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करताना समुपदेशनाचा अवलंब करण्यात यावा.

९) सर्व पदोन्नत्या विहीत वेळेत होतील याबाबत काळजी घेतली जावी.

१०) कर्मचाऱ्यांच्या तक्रारी विचारात घेऊन त्यांचा तातडीने निपटारा करण्यात यावा.

११) विविध योजनांचा फायदा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी Connectivity सक्षम करण्यात यावी. याकरिता MAHA-NET च्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाची मदत घेण्याबरोबरच नावीन्यपूर्ण संकल्पना राबविण्यावर भर दिला जावा. त्या माध्यमातून कार्यालयात Best Practices System तयार करण्यात यावी.

१२) शासकीय कामकाजात ई-ऑफिस चा वापर करण्यात यावा. तसेच १ जानेवारी, २०२५ पासून सर्व कामकाज ई-ऑफिस प्रणाली द्वारे होईल याची दक्षता घेण्यात यावी.

१३) शासकीय कामकाजामध्ये AI तसेच Block-chain सारख्या नवीन तंत्रज्ञानांचा जास्तीत जास्त अवलंब करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. त्याचप्रमाणे शासनाच्या निर्णयांची योग्य प्रकारे अंमलबजावणी क्षेत्रिय स्तरावर होण्यासाठी मार्गदर्शन करण्यात यावे.

१४) वृत्तपत्रांमध्ये तसेच इतर प्रसार माध्यमांमध्ये शासनाच्या विरोधात प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांबाबत स्पष्टीकरण खंडन करणारा खुलासा वेळेवर सादर होईल याची दक्षता घेण्यात यावी. असा खुलासा तात्काळ माहिती व जनसंपर्क विभागाकडे पाठविण्यात यावा.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचा किमान १०० दिवसांचा फलनिष्पत्ती अहवाल सादर करतांना मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ०९.१२.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने सदरबाबतच्या अमंलबजावणीचा स्वतंत्र अहवाल सादर करावयाचा आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विनाविलंब कार्यवाही करुन अहवाल शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

आपला,

(प्र.खं. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन





९५


महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), कक्ष क्र. ६३१, मुंबई- ४०००३२.
दूरध्वनी क्र. (०२२) २२७९३६५५ ईमेल आयडी:-do.18gad@maharashtra.gov.in


क्रमांक :- संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ४७ /र.व का.-१ दिनांक : - ११ डिसेंबर, २०२४

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग.

विषय :- दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांसमवेत आयोजित बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सर्व प्रशासकीय विभागाच्या सचिवांसमवेत दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीच्या सोबत जोडलेल्या इतिवृत्ताचे कृपया अवलोकन करावे.

२. सदर इतिवृत्तामधील मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही विनाविलंब करावयाची आहे.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचा किमान १०० दिवसांचा फलनिष्पत्तीचा अहवाल सादर करतांना निर्देशांच्या अंमलबजावणीचा स्वतंत्र अहवाल सादर करावा, ही विनंती.

आपला,

(दिलीप. नं. देशपांडे)
उपसचिव

प्रत माहितीसाठी-

१. मा. मुख्य सचिव (प्र.ना.उ.आणि सु.) यांच्या वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२. उपसचिव (प्र.ना.उ.आणि सु.) यांच्या स्वीय सहायक, मंत्रालय , मुंबई.
३. अवर सचिव, कार्यासन- र.व का.-२ सामान्य प्रशासन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
४. निवडनस्ती.

## दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सर्व प्रशासकीय विभागाच्या सचिवांसमवेत आयोजित बैठकीचे इतिवृत्त

दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय विभागांच्या सचिवांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले निर्देश विचारात घेऊन प्रशासकीय विभागांनी पुढील कार्यवाही विनाविलंब करावयाची आहे.

१) सर्व प्रशासकीय विभागांचे कामकाज हे लोकाभिमुख, गतिशील आणि पारदर्शक राहील यास विभागांनी सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

२) केंद्र शासनाचा राज्याप्रती असणारा सकारात्मक दृष्टिकोन विचारात घेता केंद्र शासनाकडे प्रलंबित असणाऱ्या प्रस्तावांची यादी करून संबंधित विभागांनी महाराष्ट्र सदनामध्ये कार्यरत अधिकाऱ्यांमार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, जेणेकरून केंद्रशासनाकडून वेळेवर केंद्र हिश्याचा निधी पूर्णपणे प्राप्त होईल. केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयांकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांना तसेच त्यांचेद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांना त्वरीत उत्तर देण्यात यावे.

३) पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांचा War Room मार्फत आढावा घेण्यासाठीची माहिती अद्ययावत करण्यात यावी. या War Room ची बैठक माहे डिसेंबर, २०२४ अखेर घेण्यात येईल. पायाभूत सुविधांसाठी असणाऱ्या War room प्रमाणेच केंद्र शासनाच्या तसेच राज्याच्या Flagship योजनांसाठी आणखी एक War Room कार्यान्वित करण्यात यावी. सदर War Room ची बैठक माहे जानेवारी, २०२५ च्या पहील्या आठवड्यात घेण्यात येईल.महाराष्ट्र राज्याच्या नावाने तयार करण्यात आलेल्या Dashboard व War Room मधील विषयाशी संबंधित विभागांच्या योजनांचे API मार्फत त्वरीत linking करावे, जेणेकरून योजना निहाय अद्ययावत माहिती तात्काळ उपलब्ध होईल.

४) लोकाभिमुख व पारदर्शक प्रशासनाचा भाग म्हणून सर्व प्रशासकीय विभागांनी तक्रार निवारण यंत्रणा ( Grievance Redressal System ) सक्षम करण्यावर भर द्यावा. विभागीय, जिल्हा, तालुका व ग्राम स्तरावर लोकांना देण्यात येणाऱ्या सेवा, तसेच त्या सेवांशी संबंधित माहितीचा अधिकार व आपले सरकार पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या तक्रारी यांचा वेळोवेळी आढावा घेऊन प्राप्त तक्रारींचे जलद गतीने निवारण करण्यात यावे. यासाठी तालुका व ग्राम पातळीपर्यंत यंत्रणा सुसज्ज करण्यात यावी. याबाबत प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन विभागाने कालक्रम निश्चित करुन देऊन तालुका, जिल्हा, विभाग व शासन स्तरावर जनता दरबार/लोकशाही दिन या उपक्रमांद्वारे तक्रार निवारण प्रभावी करण्यावर भर द्यावा.

५) अनेकदा शासनाच्या योजना तसेच जनतेच्या हिताचे घेण्यात आलेले निर्णय गाव पातळीपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत, त्यामुळे योजनांची अंमलबजावणी सक्षमपणे करण्यात अडचणी येतात. तसेच लोकहितास्तव निर्णय घेतलेले असूनही जनतेस शासन स्तरापर्यंत दाद मागण्यासाठी यावे लागते. सबब पालक सचिव या नात्याने आपणास नेमून दिलेल्या जिल्ह्यांना वेळोवेळी भेटी देऊन प्रशासनातील अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना मार्गदर्शन करावे. तसेच आपल्या जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचे तालुका व ग्राम/वॉर्ड पातळीवरील दौरे नियमित होतील याकडे लक्ष द्यावे.

६) विविध प्रशासकीय विभागांतर्गत स्वतंत्र संकेतस्थळे (websites) तसेच पोर्टल्स कार्यान्वित आहेत. तथापि ती विभागांकडून नियमितपणे अद्ययावत केली जात नाहीत. तरी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व विभागांनी त्यांची संकेतस्थळे तातडीने अद्ययावत करावीत. सदर संकेतस्थळे ही User friendly राहतील याची खात्री करतानाच त्यांच्या सुरक्षेस ( Cyber security ) प्राधान्य देण्यात यावे. माहितीच्या अधिकाराच्या दृष्टीने विभागाची

अधिकतम माहिती या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी. मुख्य सचिवांनी या संकेतस्थळाबाबत निकष निश्चित करून दर महिन्याला ३ सर्वोत्तम संकेतस्थळे निश्चित करावीत. या उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागांची माहिती मंत्रिमंडळासमोर गौरवार्थ ठेवण्यात यावी. सदर संकेत स्थळाकरिता प्रशासकीय विभागांनी माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्या समन्वयाने एक dedicated mechanism तयार करावा व याकरिता सर्व प्रशासकीय विभागांनी एका समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

७) दिनांक २६ जानेवारी, २०२५ पर्यंत राज्य शासनाचा डॅशबोर्ड पूर्ण क्षमतेने कार्यरत होईल याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने कार्यवाही करावी.

८) सर्व विभागांनी Ease of Living ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी आपल्या विभागाशी संबंधित सेवा सुलभतेने प्रदान करण्यासाठी प्रक्रिया ( Processes ) सुधारित कराव्यात. तसेच, याबाबत शासन सेवेतील निवृत्त झालेल्या २-३ तज्ञ सचिवांची एक समिती गठित करावी. सदर समितीने मूलभूत सेवा पुरवताना येणाऱ्या अडचणींची कारणे तसेच समस्यांचा आढावा घेऊन त्यावर ठोस उपाययोजना शासनास सादर कराव्यात.

९) प्रशासकीय सेवा देताना सक्षम मनुष्यबळ यंत्रणा तयार करण्यासाठी प्रशासकीय सेवेत नव्याने आलेल्या सुमारे १ लाख नवीन कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर ( Domain Knowledge and Administrative procedures ) भर देण्यात यावा. तसेच या नवीन कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करताना समुपदेशनाचा अवलंब करावा.

न्यायालयीन कारणास्तव रखडलेल्या पदोन्नत्या तात्काळ होण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी विधी व न्याय विभागाशी समन्वय करून त्यामधील त्रुटी ( Gap finding ) दूर करून पदोन्नत्या कराव्यात. त्याचप्रमाणे प्रशासनात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या तक्रारी विचारात घेऊन त्यावर तातडीने निपटारा करण्याची कार्यवाही करावी. त्यासाठी प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन विभागाने कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून कारणे, मानके निश्चित करून मूल्यमापन करावे.

१०) मंत्रिमंडळाच्या मान्यतेने विविध घटकांसाठी निर्माण करण्यात आलेल्या महामंडळांकरीता एकच सामायिक पोर्टल तयार करण्यात यावे. तसेच या अंतर्गत पद निर्मिती करताना त्यावरील खर्च किमान राहील याकरिता नियोजन करावे.( उदा. महामंडळांकरीता पदासाठीचा एकच आकृतीबंध )

११) राज्यामध्ये सद्य:स्थितीत कार्यान्वित विविध योजनांचा फायदा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी Connectivity सक्षम करणे आवश्यक आहे. याकरिता MAHA-NET च्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाची मदत घेण्याबरोबरच नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्यावर भर देण्यात यावा. त्या माध्यमातून राज्याच्या Best Practices System तयार करण्यात याव्यात.

१२) शासकीय कामकाजात ई-ऑफिस द्वारे आणि जास्तीत जास्त ४ स्तरावर मान्यता घेऊन निपटारा करण्याची कार्यवाही करावी. तसेच १ जानेवारी, २०२५ पासून प्रशासकीय विभागांनी सर्व कामकाज ई-ऑफिस प्रणाली द्वारे होईल याची विभागांनी दक्षता घ्यावी.

१३) मंत्रिमंडळासाठी टिप्पण्या सादर करताना एकापेक्षा अनेक विभागांचे अभिप्राय आवश्यक असल्यास संबंधित सर्व विभागांना एकाच वेळी समांतरीत्या टिप्पणी सादर करण्यात यावी.

१४) शासकीय कामकाजामध्ये AI तसेच Block-chain सारख्या नवीन तंत्रज्ञानांचा जास्तीत जास्त अवलंब करण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे शासनाच्या निर्णयांची योग्य प्रकारे अमलबजावणी करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर अद्ययावत माहिती व मार्गदर्शन करण्याबाबत विभागांनी कार्यवाही करावी.

१५) वृत्तपत्रांमध्ये तसेच इतर प्रसार माध्यमांमध्ये शासनाच्या विरोधात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांबाबत स्पष्टीकरण/ खंडन करणारा खुलासा प्रशासकीय विभागांनी वेळेवर सादर होईल याची दक्षता घ्यावी. याबाबत यापूर्वी देखील सूचना

देण्यात आलेल्या आहेत. असा खुलासा अथवा उत्तर १ तासाच्या आत माहिती व जनसंपर्क विभागाकडे पाठविण्यात यावे.

१६) राज्यामध्ये येणाऱ्या अति महत्त्वाच्या व्यक्ती/मान्यवर यांचे Liaisoning व आतिथ्य उत्कृष्ट दर्जाचे देण्याकरिता व त्या अनुषंगे राज्याची प्रतिमा बळकट करण्याकरीता व उंचावण्याकरिता राजशिष्टाचार विभागाने माफक उपलावीत. अशा महत्त्वाच्या अतिथींसमवेतच सोबत येणारे वरिष्ठ अधिकारी तसेच सुरक्षा अधिकारी यांना उत्कृष्ट दर्जाची निवासाची व्यवस्था व वाहन व्यवस्था उपलब्ध केली जाईल हे पहावे.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचा किमान १०० दिवसांचा फलनिष्पत्ती अहवाल सादर करताना उपरोक्त निदेशांच्या अंमलबजावणीचा स्वतंत्र अहवाल सादर करावा.

(सुजाता सौनिक)
मुख्य सचिव

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग.